| MHAK070006802021 | दाखल दिनांक | : २२.०३.२०२१ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : २२.०३.२०२१ |
| | निकाल दिनांक | : १७.०३.२०२६ |
| | कालावधी | : ०४ व ११ म २६ दि |

| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर**<br>(पिठासीन अधिकारी श्रीमती डी. एम. पाटील)<br>न्यायनिर्णय घोषित दि. १७.०३.२०२६<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ९०/२०२१** |
|---|---|
| **निशाणी क्र. ३७** | अपराध क्रमांक : ७२८/२०२०<br>पोलीस स्टेशन : बाळापूर, ता. बाळापूर जि. अकोला. |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>**पोलीस स्टेशन बाळापूर,** ता. बाळापूर, जि. अकोला. |
| **अभियोग पक्षातर्फे वकिल** | श्रीमती एस.आर.लोखंडे, सहाय्यक सरकारी वकिल. |
| **आरोपी** | १. **शेख अजहर शेख बिसमिल्ला,**<br>वय अंदाजे ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>२. **शेख अकबर शेख बिसमिल्ला,**<br>वय अंदाजे ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>दोघेही रा. अकोला नाका, बाळापुर,<br>ता. बाळापूर, जि. अकोला, |
| **आरोपीं तर्फे विधीज्ञ** | विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे |

**[फौजदारी मॅन्युअलमधील प्रकरण क्र.६ परीच्छेद ४४]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०.०९.२०२० |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | २०.०९.२०२० |
| दोषारोपपत्राची तारीख | १७.०३.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २४.०२.२०२५ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | १२.०३.२०२६ |

| | |
|---|---|
| निकाल राखून ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १७.०३.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | -- |

## आरोपींची सविस्तर माहिती.

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सुटकेची तारीख | दोषारोपाचे कलम | आरोपीची निर्दोष सुटका झाली कि आरोपीला सजा झाली. | आरोपीची शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्यादरम्यान आरोपीचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ व २ | वरील प्रमाणे | ०३.११.२०२० | ०४.११.२०२० | भा.दं.वि. कलम ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष सुटका १७.०३.२०२६ | -- | -- |

## <u>सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी</u>.

अ. **सरकारी साक्षीदारः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सिमा परविन शेख बिसमिल्ला (नि.क्र. ३२) | फिर्यादी |

ब. **बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

क. **न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यासः-**

| क्रमांक | साक्षीदाराचे नांव व निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## <u>सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या दस्तांची यादी</u>.

अ. **सरकार पक्षातर्फेः-**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ब. **बचाव पक्षाने मान्य केलेले दस्तऐवजः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| १ | ३६ | घटनास्थळ पंचनामा |

क. **न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले दस्तः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | दस्तऐवजाचे वर्णन. |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड. **जप्त वस्तुंचे वर्णनः–**

| अनुक्रमांक | वस्तूंचा नंबर | वस्तूचे वर्णन |
|---|---|---|
| १ | –– | एक गुलाबी रंगाचे लाल बाहया असलेले जुने वापरते टॉप |

## न्यायनिर्णय

(घोषणा तारीख १७.०३.२०२६)

**१.** आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (थोडक्यात 'भा.दं.वि.') कलम ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये संपरीक्षा सुरु आहे.

**प्रकरणाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे** –

**२.** फिर्यादी सिमा परविन शेख बिसमिल्ला, रा. बाळापुर, ता. बाळापूर जि. अकोला यांनी पोलीस स्टेशन बाळापूर येथे तक्रार दिली की, दिनांक २०.०९.२०२० रोजी सकाळी ११.३० ते १२.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी तिच्या पतीला शोधण्यासाठी बाळापुर येथील दिक्षा कॉन्हेंन्ट जवळील विट भट्टयावर गेली असता आरोपींनी तेथे येवुन फिर्यादीला ''तु येथे का बसली'' असे म्हणुन तिला शिवीगाळ केली. आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा पाय ओढुन खाली पाडले व आरोपी क्र. १ ने तिच्या अंगावर बसुन तिचे कपडे फाडुन जिवाने मारण्याची धमकी देवुन तिचा विनयभंग केला.

**३.** सदर फिर्याद अन्वये आरोपींविरुध्द बाळापूर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.क्र. ७२८/२०२० अन्वये भा.दं.वि. कलम ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अमंलदार श्रीमती अनिता इंगळे, पो. उप नि. यांनी प्रकरणाचा तपास करुन तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपींविरुध्द निशाणी २२ वर भा.दं.वि. ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे आरोप ठेवले. ते आरोपींना वाचून व समजावून सांगितले असता त्याने नाकबुल करुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** सदर प्रकरणात (नि.क्र.३०) अन्वये फिर्यादी व आरोपी यांनी तडजोड अर्ज अभिलेखावर दाखल केला. परंतु, आरोपीविरुध्द दाखल करण्यात आलेला गुन्हा भा.दं.वि. कलम ३५४ब हा तडजोड पात्र गुन्हा नसल्याने सदर गुन्ह्यासाठी परवानगी नाकारली. सदर प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यामुळे तांत्रिक अडचण येवू नये म्हणून अभियोगपक्षाने केवळ फिर्यादीला तपासले. आरोपींविरुध्द कोणताही सकृतदर्शनी पुरावा मिळून न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.डी.कदम व आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे प्रश्न निश्चितीकरीता उपस्थित होतात व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसहित नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २०.०९.२०२० रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजताचे दरम्यान दिक्षा कॉन्हेंन्ट जवळ, विट भट्टी, बाळापुर, ता. बाळापूर जि. अकोला येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला खाली पाडुन तिचे अंगावर बसुन तिचे कपडे फाडुन विनयभंग करुन भा.दं.वि. कलम ३५४ब सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला खाली पाडुन तिला दुखापत करुन भा.दं.वि. कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित करुन भा.दं.वि. कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे भा.दं.वि. कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही.** |
| ५. | काय आदेश ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**७.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी वरील प्रमाणे फक्त फिर्यादीला तपासले. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी आपसात तडजोड झाली असलेबाबतचा तडजोड अर्ज (नि.क्र.३०), पुरसीस (नि.क्र.३१) व पुरावा बंद पुरसीस (नि.क्र.३५) दाखल केलेले आहे. फिर्यादीला आरोपींविरुध्द प्रकरण चालविणे नसल्यामुळे न्यायालयाचा वेळ आणि संसाधनाचा अपव्यय होवु नये म्हणुन इतर साक्षीदारांना तपासुन काही साध्य होणार नसल्याने इतर साक्षीदारांना तपासण्यात आले नाही आणि नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**<u>प्रश्न क्रमांक १ ते ४ करीता</u>** -

८. वरील प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितरित्या नोंदविण्यात येत आहे.

**९.** सिमा परविन (स.सा.क्र.१) ही प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असून तिने तिच्या साक्षीत, घटनेला ५-६ वर्ष झाले असुन तिचा आंतरजातीय विवाह झालेला असल्याच्या कारणावरुन तिचे व आरोपी यांचेत बोलचाल झाल्याचे व तिने रागाच्या भरात आरोपींविरुध्द रिपोर्ट दिल्याचे सांगितले. फिर्यादीने रिपोर्ट वरील अंगठा तिचा असल्याचे सांगुन त्यातील मजकुर माहीत नसल्याचे कथन केले.

**१०.** फिर्यादी अभियोग पक्षास समर्थन देत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी तिला उलटतपासाच्या अनुषंगाने प्रश्न विचारले, परंतु त्यावेळी देखील फिर्यादीने तिची व आरोपींची तडजोड झालेली आहे ही बाब मान्य केली व आरोपींकडून

तिचा विनयभंग करुन मारहाण, शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या बाबी नाकारल्या आहे. सबब, अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळेल असे काही त्यातून निष्पन्न झाले नाही.

११. मा. सर्वोच्च न्यायालय **मदन मोहन अबोट विरुध्द पंजाब राज्य (२००८) ४ एस.सी.सी. पान नं. ५८२** या न्यायनिर्वाळयात समाजात आपसी सलोखा प्रस्थापित करणे करीता तडजोडपात्र नसलेल्या गुन्हयामध्ये न्यायालयाने प्रकरण निकाली करण्याच्या दृष्टीने योग्य त्या प्रक्रियेचा अवलंब करुन आणि कार्यवाही करुन तजविज करावी असे प्रतिपादन केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी आणि आरोपी यांचेत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली असल्याने त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे. वरील परिस्थितीत प्रकरण चालविल्यास त्यांचेतील आपसी संबंध खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी समाजामधील सलोखा प्रभावित होणार असल्याने उपरोक्त न्यायानिवाडयातील न्यायतत्व विचारात घेवुन प्रकरण निकाली काढणे योग्य होणार आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अभियोग पक्षाच्या कथनास बळकटी मिळेल असे काहीही साक्षीदाराच्या साक्षीतुन निष्पन्न झाले नाही, त्यामुळे साक्षीदाराचा पुरावा विश्वासार्ह नाही.

१२. वरील सर्व विवेचनावरुन असे आढळून येते की, फिर्यादीने अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. उलटपक्षी आरोपींशी न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणात परिस्थितीजन्य पुरावे जसे की, घटनास्थळ पंचनामा आरोपींतर्फे मान्य करण्यात आला असला तरी प्रकरणातील मुख्य साक्षीदार म्हणजे फिर्यादीने विनयभंग केल्याचे, मारहाण करुन शिवीगाळ व धमकी दिल्याच्या बाबी पुराव्यात नाकारल्या असल्याने सदर परिस्थितीजन्य पुराव्यास काही महत्व राहत नाही. सबब, उपलब्ध पुरावा आरोपींनी भा.दं.वि. कलम ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला हे निसंशयपणे शाबीत करु शकत नाही. तरी कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार अशा संदिग्ध व अस्पष्ट पुराव्याचा फायदा आरोपींना मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारात्मक नोंदवित असुन प्रश्न क्र. ५ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. आरोपी क्र. १ **शेख अजहर शेख बिसमिल्ला** आणि आरोपी क्र. २ **शेख अकबर शेख बिसमिल्ला** यांची भारतीय दंड विधान कलम ३५४ब, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ च्या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तीक व जामिनदाराचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक गुलाबी रंगाचे लाल बाहया असलेले जुने वापरते टॉप मुल्यहिन असल्याने त्याची अपील कालवधी नंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट करावी.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व त्याच रकमेचा लायक जामीनदार द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यात आला.)

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.18 12:51:52 +0530

दिनांक : १७.०३.२०२६. ( श्रीमती डी. एम. पाटील )
ठिकाणः बाळापूर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

<table>
<tr><td colspan="3">I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order.</td></tr>
<tr><td>Name of the Court</td><td>:-</td><td>Smt. D. M. Patil<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur</td></tr>
<tr><td>Name of the Stenographer</td><td>:-</td><td>A.S.Gawali</td></tr>
<tr><td>Date of Decision</td><td>:-</td><td>17/03/2026</td></tr>
<tr><td>Judgment signed by P.O on</td><td>:-</td><td>17/03/2026</td></tr>
<tr><td>Judgment uploaded on</td><td>:-</td><td>18/03/2026</td></tr>
</table>